# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## निदेश क्र. १२/२०२५

**''विद्यापीठ शिक्षकेत्तर पदावरील सरळसेवा प्रवेश, पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश,२०२५.''**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्रातील सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठाकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६/२०१७) (यापुढे अधिनियम, २०१६ असा उल्लेख केल्या जाईल.) हा दिनांक १ मार्च २०१७ पासून लागु करण्यात आला असून हा अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली (यापुढे "विद्यापीठ" असा उल्लेख) या विद्यापीठाला सुद्धा लागु करण्यात आला आहे.

**आणि**

**ज्याअर्थी,** अधिनियम २०१६ च्या कलम ७१(२०) प्रमाणे विद्यापीठातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सेवा शर्ती संबंधी विद्यापीठाव्दारे महाराष्ट्र शासनाच्या धोरणाशी सुसंगत परिनियम निर्गमित करण्याचा अधिकार विद्यापीठास प्रदान करण्यात आलेला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाच्या १) शासन निर्णय क्र. जीयुजी २०११/(१०४/११)/विशी–१ दिनांक १६ मे, २०११, २) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण–२०१२/(२८९/१२)/विशी–१ दिनांक ०५ डिसेंबर, २०१३, ३) शासन निर्णय क्रमांक: पदनि २०१५/प्र.क्र.७२५/१५/विशी–१ दिनांक ०३ जुलै,२०१७ व ४) शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण–२०१६/प्र.क्र.६१३/विशी–१ दिनांक १९ सप्टेंबर, २०१९, नुसार विद्यापीठास एकंदरीत १९३ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदे (सरळसेवा तसेच पदोन्नतीद्वारे भरावयाची एकंदर पदे) मंजुर करण्यात आली आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** विद्यापीठ आस्थापनेवरील मंजुर वर्ग–१, वर्ग–२, वर्ग–३, आणि वर्ग–४ मध्ये समाविष्ट पदावर सरळसेवा भरती प्रक्रीयेसाठी परीक्षेचे आयोजन, व्याप्ती आणि वर्गवारीनुसार परीक्षेचे स्वरूप ठरवून परीक्षा आयोजित केल्या जाण्यासंबधी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिनांक ०७/०५/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत बाब क्रमांक ४ नुसार निर्णय घेण्यात आलेला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक ६ जुन २०१७ नुसार गट क (सेवा प्रवेश) नियम २०१७ निर्गमित करण्यात आले आहे.

**आणि**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाद्वारे राज्य शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना पदोन्नती देण्याकरीता अनुसरावयाच्या कार्यवाही बाबतची एकत्रित मार्गदर्शक तत्वे

शासन निर्णय क्रमांक:एसआरवी—२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दिनांक ०१/०८/२०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. विपधो २६२०/प्र.क्र.१६/का. १७ दि. ३१ मार्च, २०२१ मध्ये "प्रशासकिय विभागांमार्फत ज्या पदासाठी विभागीय परिक्षा आयोजित करण्यात येतात अशा सर्व विभागीय परिक्षा संदर्भातील सामाईक बाबीचे धोरण निश्चीत करण्यात येत आहे असे नमुद करण्यात आले असून सदर धोरण हे केवळ राज्य शासकिय कर्मचा—यांनाच लागू राहील हे धोरण जिल्हा परिषदा/नगरपालिका/महानगरपालिका/शासनाच्या अधिपत्याखालील मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे/अन्य निमशासकिय आस्थापनेमधिल कर्मचारी यांना लागू होणार नाही असे नमुद करण्यात आले असल्याने पदोन्नतीकरिता विभागीय परिक्षा न घेण्याचे विद्यापीठाने निश्चित केले आहे;

**आणि**

**ज्याअर्थी,** वरील उल्लेखित दिनांक ०१/०८/२०१९ चा शासन निर्णय आणि दिनांक ०७/०५/२०१८ रोजीचा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचा निर्णयाचा समावेश करून अधिनियम २०१६ च्या कलम ७१(२०) नुसार विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सरळसेवा नियुक्ती आणि पदोन्नती संबधात योग्य अशा परिनियमाचे निर्गमन करणे आवश्यक असल्याकारणाने पंरतु अशा तऱ्हेचा परिनियम निर्गमित करण्याची प्रक्रीया क्लिष्ट आणि वेळखाऊ असल्यामुळे त्याासंबधातील पर्यायी व्यवस्था म्हणून अधिनियम २०१६ च्या कलम १२(८) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून पुर्ननिर्गमित केलेला निदेश क्र.०३/२०२४ (अ) कलम १२(८) च्या पंरतुका मधील तरतुदीनुसार दिनांक १३/१२/२०२४ रोजी आपोआप व्यपगत झाला असल्यामुळे व विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीचे प्रकरणे प्रलंबित असल्याने व्यपगत झालेल्या निदेश क्र. ०३/२०२४ (अ) च्या तरतुदींच्या समावेश करून आवश्यक बदलांसहीत नवीन निदेश निर्गमित करणे आवश्यक आहे.

**आणि**

**त्याअर्थी** निदेश क्र. ०३/२०२४ निरस्त करून योग्य सुधारणे सहित नविन निदेश जारी करणे आवश्यक असल्यामुळे मी. डॉ. प्रशान्त श्री. बोकारे, विद्यापीठ, अधिनियमातील कलम १२(८) चा वापर करून निदेश क्र. ०३/२०२४ मधील तरतुदींचा योग्य फेरफार सहित समावेश करून नविन निदेश जारी करीत आहे.

१. या निदेशाला ''विद्यापीठ शिक्षकेत्तर पदावरील सरळसेवा प्रवेश, पदोन्नतीसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव, साक्षात्कारासाठी गुणवत्ता ठरविण्याकरिता परीक्षा पध्दती आणि निवड समितीची रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२५'' असे संबोधण्यात येईल.
२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्यातारखेपासून अमंलात येईल.
३. हा निदेश महाराष्ट्र नागरी सेवा नियम व महाराष्ट्र शासनाने शिक्षकेत्तर पदांच्या सेवाशर्तीनुसार सरळ सेवाभरती व पदोन्नती विषयी वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, शासन राजपत्र, शासन परिपत्रक, आदेश, विनियम इत्यादी मधील तरतुदींच्या अधिन

राहून विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदावरील सरळसेवाद्वारे तसेच पदोन्नतीद्वारे करावयाच्या नियुक्त्यासह लागू होईल.

४. विद्यापीठ आस्थापनेवरील सर्व पद वर्गवारीतील सरळसेवा भरतीसाठी स्वत:ला पात्र समजणाऱ्या उमेदवाराला आवेदन पत्राचे शुल्क म्हणून खाली नमुद असलेली राशी धनाकर्षाद्वारे आवेदन पत्रासोबत भरावी लागेल.

अ) सर्वसाधारण वर्गवारीचा उमेदवार रूपये ५००/—

ब) राखीव प्रवर्गातील उमेदवार रूपये ३००/—

पद वर्गवारीनिहाय विद्यापीठाला जे अर्ज प्राप्त होतील त्या अर्जांमधून पात्रता धारक उमेदवार शोधून काढण्यासाठी सर्व अर्जांची छाननी करण्यात येवून पात्रताधारक उमेदवारांची यादी तयार करण्यात येईल आणि पात्रताधारक उमेदवारांना सरळ सेवाभरती प्रक्रियेसाठी आयोजित परीक्षेमध्ये सामावून घेण्यात येईल.

५. अ) वर्ग १, वर्ग २ आणि वर्ग ४ पदावरील सरळ सेवाभरती प्रक्रियेसाठी लेखी परिक्षेचे आयोजन करण्यात येवून परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर पदनिहाय गुणवत्ता यादी तयार करून उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल. वर्ग ३ मध्ये समाविष्ट पदाकरिता लेखी आणि संगणकीय परीक्षांचे आयोजन केले जाईल. परिक्षांमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर गुणवत्ता यादी तयार करून उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

ब) पद वर्गनिहाय आयोजित परीक्षांमध्ये उमेदवाराने प्राप्त केलेले एकूण गुण विचारात घेवून ही गुणवत्ता यादी तयार केली जाईल. या यादीमधील उमेदवारांना खाली नमुद असलेल्या सुत्रानुसार मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल.

**सुत्रः—**

पदभरती संख्या — १ (गुणवत्ता यादीनुसार ८ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — २ (गुणवत्ता यादीनुसार १० उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ३ (गुणवत्ता यादीनुसार १२ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ४ (गुणवत्ता यादीनुसार १४ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)
पदभरती संख्या — ५ (गुणवत्ता यादीनुसार १६ उमेदवारांना मुलाखतीस बोलविले जाईल.)

क) मुलाखतीसाठी बोलविलेल्या उमेदवांरामधून निवडसमितीद्वारे उमेदवाराची निवड करण्यात येईल. ही निवड केली जाण्यासाठी निवड समितीमध्ये समाविष्ट असलेल्या सदस्यांची संख्या विचारात घेण्यात येईल. निवड समितीच्या प्रत्येक सदस्यास एकूण १०० गुणांमधून गुणदान प्रदान करण्याचा अधिकार प्राप्त असेल. निवड समितीच्या प्रत्येक सदस्याने मुलाखती मधील उमेदवाराच्या कामगिरीच्या आधारावर १०० गुणांपैकी गुणदान केल्यानंतर निवड समितीच्या उपस्थित सदस्यांच्या गुणदानाची बेरीज करण्यात येईल आणि निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या गुणांच्या एकूण बेरीज संख्येला निवड समितीच्या सर्व उपस्थित सदस्याच्या एकूण संख्येने विभाजित केल्यानंतर येणारी संख्या म्हणजे सदर उमेदवाराने १० गुणांपैकी प्राप्त केलेल्या गुणांचा आकडा असेल.

उमेदवाराने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या संख्येत सदर उमेदवाराने मुलाखती मधील कामगिरीच्या आधारावर प्राप्त केलेल्या गुणांना जोडण्यात येवून गुणवत्ता ठरविली जाईल आणि या आधारावर उमेदवाराची निवड समितीद्वारे निवड करण्यात येवून शिफारस

करण्यात येईल. तसेच उमेदवाराने लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारावर निर्धारीत केल्या जाणाऱ्या सुत्राचे अधिनराहून त्यांना संगणकीय चाचणीसाठी बोलविण्यात येईल. या चाचणी परीक्षेमधील पात्रताधारक उमेदवारांना गुणवत्तेनुसार वर नमुद सुत्राचे अधिनराहून मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल. वर नमुद असलेल्या सुत्राच्या आधारावर मुलाखतीसाठी बोलावण्यात येणाऱ्या उमेदवारामधील शेवटच्या उमेदवाराने जे गुण प्राप्त केले असतील ते गुण आणखी इतर उमेदवारांना प्राप्त झाले असतील तर अशावेळी सदर गुणसंख्या प्राप्त करणाऱ्या सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्यात येईल.

लेखी परीक्षेच्या आधारावर तयार करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीमधील उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येवून निवड समितीद्वारे निवड केली जाण्यासाठी जे सुत्र वर नमुद केले आहे. तेच सुत्र लेखी आणि संगणकीय परीक्षा घेतलेल्या उमेदवारांच्याबाबतीत सुध्दा लागू राहील.

ड) ज्या उमेदवारांची लेखी परीक्षा घेण्यात येईल त्यांची परीक्षा प्रत्येक वर्गासाठी ९० गुणांची असेल आणि ज्या उमेदवारांची लेखी तसेच संगणकीय परीक्षा घेण्यात येईल. त्यांची लेखी परीक्षा ७० गुणांची आणि संगणकीय परीक्षा २० गुणांची असेल.

इ) पदाचे स्वरूप कार्य कौशल्यावर आधारित असल्यास आणि त्या पदासाठी प्रात्यक्षिकाची गरज भासत असल्यास त्या पदासाठीच्या परिक्षेचे स्वरूप प्रात्यक्षिकावर आधारित राहून हे प्रात्याक्षिक २० गुणांचे असेल.

ई) लेखी परीक्षेसाठी निर्धारित केला जाणारा अभ्यासक्रम, संगणक परीक्षेसाठी निर्धारित केला जाणारा अभ्यासक्रम, वर्गनिहाय प्रत्येक परिक्षेसाठी प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांची संख्या, परीक्षा घेण्यासाठी दिला जाणारा वेळ आणि परिक्षेचे वर्गनिहाय वेळापत्रक इत्यादी बाबी ठरवून त्यांची शिफारस केली जाण्यासाठी व्यवस्थापन परिषदेद्वारे जास्तीत जास्त ४ तज्ञ व्यक्तींची समिती नियुक्त करून अहवाल प्राप्त करण्यात येईल.

फ) प्रत्येक गुणवत्ता यादीमध्ये उमेदवारास स्थान प्राप्त करण्यासाठी प्रत्येक प्रकारच्या परिक्षेमध्ये किमान ५०% गुण प्राप्त करणे अनिवार्य असेल. यासाठी प्रत्येक परीक्षा हा स्वतंत्र घटक मानण्यात येईल.

६. विद्यापीठातील शिक्षकेत्तर पदांच्या सेवाप्रवेश आणि पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना या निदेशातील परिशिष्ट अ आणि ब मधील तरतुदीनुसार राहील.

७. गट—अ मधील सरळसेवा प्रवेशासाठी वयोमर्यादा कमाल ३८ वर्ष असेल, परंतु मागासवर्गीय उमेदवारांना यामध्ये पाच वर्षाची शिथीलता देण्यात येईल. पदोन्नतीची पदे भरतांना, जे कर्मचारी शासन निर्णय क्रमांक एसआरवी: २०१८/प्र.क्र १५९ कार्यासन द्वारा, दिनांक ०१/०८/२०१९ च्या बिंदू क्रमांक ५.१ मधील तरतुदीनुसार मुळ/सुधारित सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असतील त्यांचे मधून बिंदूनामावलीच्या क्रमांनुसार पदे भरण्यात येतील. कनिष्ठ पदावर कार्यरत जे कर्मचारी शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नसतील मात्र त्यांनी वयाची ४५ वर्षे पूर्ण केले असतील अशा कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकरणाला असतील.

८. गट—ब पदांकरिता सरळसेवेसाठी वयोमर्यादा किमान २५ वर्षे व कमाल ३८ वर्षे राहील, परंतु मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता राहील. शासन निर्णय क्रमांक एसआरवी: २०१८/प्र.क्र १५९ कार्यासन द्वारा, दिनांक ०१/०८/२०१९ च्या बिंदू क्रमांक

५.१ मधील तरतुदीनुसार मुळ/सुधारित सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असतील त्यांचे मधून बिंदूनामावलीच्या क्रमांनुसार पदे भरण्यात येतील. कनिष्ठ पदावर कार्यरत जे कर्मचारी शैक्षणिक अर्हता पूर्ण करीत नसतील मात्र वयाची ४५ वर्षे पूर्ण केले असतील अशा कर्मचाऱ्यांसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शिथील करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकरणाला असतील.

९. सरळसेवेसाठी गट ''क'' आणि ''ड'' साठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे असून मागासवर्गीय उमेदवारांना पाच वर्षाची शिथीलता असेल.

१०. गट क करीता, ज्या पदांमध्ये पदोन्नती द्यावयाची आहे अशा पदांवर पदोन्नती देतांना कनिष्ठ पदावरील कार्यरत जे कर्मचारी शासन निर्णय क्रमांक एसआरवी: २०१८/प्र.क्र १५९ कार्यासन द्वारा, दिनांक ०१/०८/२०१९ च्या बिंदू क्रमांक ५.१ मधील तरतुदीनुसार मुळ/सुधारित सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार सरळसेवेची शैक्षणिक अर्हता पुर्ण करीत असतील त्यांना बिंदु नामावलीच्या क्रमानुसार व नियमानुसार १००/५०:५०/७५:२५/८०:२० या प्रमाणात पदोन्नती देण्यात येईल.

११. निम्न श्रेणी लिपीक हे पद ५० टक्के पदोन्नतीने भरावयाचे पद आहे. हे पद भरतांना गट—'ड' मधील कार्यरत सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांची संयुक्त सेवा जेष्ठता यादी तयार करून शैक्षणिक अर्हता पूर्ण करणारे सेवा जेष्ठ कर्मचारी, बिंदुनामावली क्रमांनुसार पात्र समजण्यात जातील.

१२. पदोन्नतीकरीता ज्या ठिकाणी कर्मचाऱ्यांचे कार्य मुल्यमापन अहवाल विचारार्थ घ्यावयाचे आहे त्यात्या ठिकाणी शासन निर्णय क्रमांक एसआरवी: २०१८/प्र.क्र १५९ कार्यासन द्वारा, दिनांक ०१/०८/२०१९ मधील निकष लागू होईल.

१३. सरळसेवेने पद भरतीसाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील अनुसूचीमध्ये उल्लेख करण्यात आलेली विद्यापीठे व त्यांची संलग्नित महाविद्यालये आणि शासन मान्यताप्राप्त संस्थेत नियमित/कायम पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट लागू असणार नाही.

१४. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या एकत्रित वैतनिक कर्मचारी तसेच कंत्राटीपध्दती किंवा विविध योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या कार्मचाऱ्यांना सरळसेवेकरीता उच्च वयोमर्यादेची अट लागू असणार नाही.

१५. सरळसेवा आणि पदोन्नतीसाठी गट अ, ब आणि क साठी(वाहन चालक वगळून) उमेदवारांना या संगणकीय अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. यासाठी महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.) विभाग यांचे शासन निर्णय क्र. मातसं २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ४ फेब्रुवारी, २०१३ व शासन पुरक पत्र क्र. मातसं २०१२/प्र.क्र.२७७/३९, दिनांक ८ जानेवारी, २०१८ मध्ये नमुद संगणकीय अभ्यासक्रमातील कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१६. आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत ज्यादिवशी आश्वासित पदाच्या वेतनश्रेणीचा कर्मचाऱ्यांना लाभ प्राप्त होईल त्या दिनांकापासून संबंधीत पदाच्या अनुभवाचा कालावधी पूढील नियमित पदोन्नती करिता ग्राहय धरण्यात येईल.

१७. विद्यापीठातील कार्यरत कनिष्ठ पदावरील कर्मचाऱ्यांना जर वरिष्ठ पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला असेल तर अशा कर्मचाऱ्यांचा वरिष्ठ पदावर केलेल्या कार्याचा कालावधी सरळसेवेत नियुक्तीसाठी अनुभव म्हणून ग्राहय धरण्याचा अधिकार कुलगुरूंना असेल.

१८. सरळसेवा नियुक्तीने भरावयाची पदे जेव्हा केव्हा रिक्त होतील त्या—त्यावेळी रिक्त होणाऱ्या दिनांकाच्या सहा महिण्यापूर्वी ती पदे भरण्याची कार्यवाही प्रशासनाने पूर्ण करावयाची आहे.

१९. पदोन्नतीने नियुक्त करावयाच्या रिक्त पदांच्या बाबतीत दिनांक १ जानेवारी व दिनांक १ जुलैची स्थितीत पासुन सेवाजेष्ठ व बिंदूनामावलीनुसार दरवर्षी साधारणात: सप्टेंबर व मार्च महिन्यात विभागीय पदोन्नती समितीची सभा आयोजित करून सदर रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी. रिक्त होणाऱ्या पदांवर पदोन्नती देण्यासाठी कर्मचाऱ्यांची प्रतिक्षा यादी तयार करून पदे रिक्त होताच सदर कर्मचाऱ्यांचे पदोन्नतीने नियुक्ती आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी.

२०. शिक्षकेत्तर पदांच्या सरळसेवा प्रवेश आणि पदोन्नतीसाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि निवड समितीची रचना या निर्देशासोबत जोडून असलेल्या परिशिष्टामधील तक्त्यात नमुद केल्यानुसार असेल.

**स्थळ: गडचिरोली**
**दिनांक:** २० /०५/ २०२५

**(डॉ. प्रशान्त श्री. बोकारे)**
**कुलगुरू**

परिशिष्ट 'अ'

(गट—अ)

| अ. क्र | पदनाम, वेतनबॅड व ग्रेड वेतन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाज्येष्ठता व गुणवतेनुसार) | |
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| १. | **उपकुलसचिव**<br>वेतन बॅड<br>एस—२३=<br>६७७००—२०८७०० | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युतर अथवा इयता १२ वी नंतर किमान पाच वर्ष शैक्षणिक कालावधीची पदवी उत्तीर्ण.<br>२. सहाय्यक कुलसचिव किंवा समकक्ष पदाचा वेतन बॅड रु. १५६००—३९१००, ग्रेड वेतन रु. ५४००/— मधील किमान तीन वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव<br>**अथवा**<br>महाविद्यालयीन स्तरावरील पूर्णवेळ शिक्षक म्हणून अध्यापनाचा रु. १५६००—३९१००ग्रेड वेतन रु. ६०००/— मधील किमान पाच शैक्षणिक वर्षाचा अनुभव<br>**अथवा**<br>मान्यता प्राप्त विद्यापीठातील अधिकारी संवर्गात प्रशासकीय कार्याचा पाच वर्षाचा अनुभव<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १. सहाय्यक कुलसचिव पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिकगोपनिय अहवाल समाधानकारक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% पदोन्नती<br>५०% सरळसेवा |
| २. | **सिस्टीम ॲनलिस्ट**<br>वेतन बॅड :<br>एस—२३=<br>६७७००—२०८७०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एससी (भौतिकशास्त्र/गणित/सांखिकीशास्त्र) पदवी उतीर्ण किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर कॉम्प्युटर सायन्स पदविका उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>एम.एससी. (कॉम्प्युटर सायन्स)/ अभियांत्रीकी पदवी (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी/कॉम्पुटर सायन्स/ कॉम्पुटर टेक्नॉलॉजी/एम.सी.ए. /डीओईएसीसी ची "बी" अथवा "सी" लेव्हल परीक्षा उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/ शासकीय संस्थांमधीलप्रोग्रॅमर/ॲनालिस्ट या पदाचा तसेच Updated Knowledge of State of fhe Art Software Systemमधील कामाचा किमान सात वर्षाचा अनुभव.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | **विद्यापीठ अभियंता**<br>वेतन बॅड:<br>एस—२३=<br>६७७००—२०८७०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रीकी पदवी परीक्षा उत्तीर्ण. **पदव्युत्तर पदवी असल्यास प्राधान्य.**<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थांमधील प्रत्यक्ष इमारत बांधकामाच्या पर्यवेक्षणाचा स्थापत्य अभियांत्रीकी संबंधीचा तसेच व्यवस्थापन,दैनदिन पत्रव्यवहार, निविदा व करारनामे, अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव अथवा सहाय्यक / कनिष्ठ अभियंता पदाचा वेतन बॅड ९३००—३४८००, ग्रेड वेतन रु. ५४०० या वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १. उपअभियंता पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनिय अहवाल समाधानकारक.<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% पदोन्नती<br>५०% सरळसेवा<br><br>सदर पद आळीपाळीने प्रथम पदोन्नती व नंतर सरळसेवेनी भरण्यात येईल. |
| ४. | **सहाय्यक कुलसचिव**<br>वेतन बॅड<br>एस—२०=<br>५६१००—१७७५०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी अथवा १२ वी नंतरची किमान ५ वर्ष शैक्षणिक कालावधीची पदवी उत्तीर्ण.<br>२. अधीक्षक / कक्षधिकारी(सर्वसाधारण) जो यास्तव समकक्ष पदावरील वेतन बॅड रु.९३००—३४८००, ग्रेड वेतन रु.४४०० /— मधील किमान तीन वर्षाचा प्रशासकीय कामाचा अनुभव.<br>**अथवा**<br>महाविद्यालयीन स्तरावरील पूर्णवेळ शिक्षक म्हणून अध्यापनाचा रु. ९३००—३४८०० ग्रेड वेतन रु. ४४०० /— मधील किमान पाच वर्षाचा शैक्षणिक अनुभव.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १. अधिक्षक पदाचा किमान ३ वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल समाधानकारक.<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% पदोन्नती<br>५०% सरळसेवा |
| ५. | **जनसंपर्क अधिकारी**<br>वेतन बॅड:<br>एस—२०=<br>५६१००—१७७५०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची मॉस कम्युनिकेशन / जर्नालिझम / पब्लिक रिलेशन किंवा समकक्ष विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण प्रसार माध्यमामधील (उपसंपादक दर्जापेक्षा कमी नसावा) / शासन मान्यता प्राप्त संस्थेमधील संपादकीय कामाचा अथवा जनसंपर्क अधिकारी पदाचा किमान पाच वर्षाचा अनुभव.<br>२. मराठी,इंग्रजी व हिन्दी या भाषावर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य आवश्यक.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६. | **तांत्रिक अधिकारी**<br>वेतन बॅड:<br>एस—२०=<br>५६१००—१७७५०० | — | — | शैक्षणिक अर्हता व आवश्यक अनुभव स्वतंत्रपणे निर्गमित केल्या जाईल. |

## गट—ब

| अ. क्र. | पदनाम वेतनबॅड व ग्रेड वेतन | सुधारित शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाजेष्ठता व गुणवतेनुसार) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ७. | **स्वीय सहायक**<br>वेतन बॅड:<br>एस—१६ =<br>४४९००—१४२४०<br>० | | १. मराठी/इंग्रजी लघुलेखन १२० श. प्र.मि. आणि मराठी/इंग्रजी टंकलेखन ४०/५० श.प्र.मि. चे शासकीय व्यवसायिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२. वरिष्ठ श्रेणी लघुलेखक (मराठी/इंग्रजी) या पदावरील किमान तीन वर्षाचा अनुभव<br>३. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनिय अहवाल समाधानकारक आवश्यक<br>४. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक.<br>5.MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १००% पदोन्नती |
| ८. | **अधिक्षक**<br>वेतन बॅड:<br>एस—१५=४१८००<br>—१३२३०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी/पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२. विद्यापीठातील लिपीक संवर्गातील किंवा समकक्ष वेतनश्रेणीतील किमान पाच वर्षाचा प्रशासकीय/कार्यालयीन कामाचा | १. निवड श्रेणी लिपीक या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय | ५०% पदोन्नती<br>५०% सरळसेवा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अनुभव<br>**अथवा**<br>शासकीय सेवेतील किंवा शासनमान्य शैक्षणिक संस्थेतील गट 'क' संवर्गामधील एकुण पाच वर्षाचा प्रशासकिय /कार्यालयीन कामकाजाचा अनुभव<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | अहवाल समाधानकारक आवश्यक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | |
| ९. | **सहाय्यक तांत्रिक अधिकारी**<br>वेतन बॅड:<br>एस—१५=४१८००—१३२३०० | — | — | शैक्षणिक अर्हता व आवश्यक अनुभव स्वतंत्रपणे निर्गमित केल्या जाईल. |
| १०. | **असिस्टंट प्रोग्रॅमर**<br>वेतन बॅड:<br>एस—१४ = ३८६००—१२२८०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.एससी. (कॉम्प्युटर सायन्स) एम.सी.ए. /अभियांत्रिकी पदवी (कॉम्प्युटर सायन्स/ इन्फार्मेशन टेक्नॉलॉजी/कॉम्प्युटर टेक्नॉलॉजी/कॉम्प्युटर सायन्स व अभियांत्रिकी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.<br>**अथवा**<br>संगणक शास्त्र/माहिती तंत्रज्ञान मधील पदव्युत्तर पदविका प्रथम श्रेणी अथवा ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण किंवा डीओईएसीसीची ए लेव्हलची परिक्षा उत्तीर्ण<br>२. शासकीय संस्थेमधील प्रकल्प/लिक्स सिस्टीम ॲडमिनिस्टेशन/वेब डिझायनिंग डेव्हलपमेंट यामधील किमान तीन वर्षाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | १००%<br>(सरळसेवा) |

## गट—क

| अ. क्र. | पदनाम वेतनबॅड व ग्रेड वेतन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाज्येष्ठता व गुणवत्तेनुसार) | |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ११. | **कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**<br>वेतन बॅड:<br>एस—१५=४१८००—१३२३०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून स्थापत्य अभियांत्रिकी विषयाची पदवी किंवा पदविका 'बी' ग्रेडसह उत्तीर्ण आणि शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय संस्थेमधील प्रत्यक्ष इमारत बांधकाम व पर्यवेक्षण तसेच दैनदिन कामाचे | १. कनिष्ठ अभियंता या पदाची शैक्षणिक अर्हतेची अट पूर्ण केलेली असावी.<br>२.मिस्त्री पदाचा तीन वर्षाचा अनुभव.<br>३. मागिल तीन | २५% (पदोन्नती)<br>७५%(सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | पर्यवेक्षण, पत्रव्यवहार व करारणामे, अंदाजपत्रके तयार करणे इत्यादीचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>2. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | वर्षाचे गोपनिय अहवाल समाधानकारक<br>४.मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदांकरीता जात वैधता प्रमाणप्त्रा आवश्यक. | |
| १२. | **कनिष्ठ अभियंता (विद्युत)**<br>वेतन बॅड:<br>एस—१५=४१८००—१३२३०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची विद्युत अभियांत्रीकी पदवी परीक्षा उत्तीर्ण अथवा विद्युत अभियांत्रीकी पदविका परिक्षा प्रथम श्रेणी अथवा 'ए' ग्रेड मध्ये उत्तीर्ण.<br>२. शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय संस्थेमध्ये संबंधित क्षेत्रात काम केल्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव आणि कारखाना, सब स्टेशन, उच्चदाब विद्युत वाहिनी, जनरेटर, दुरध्वनी यंत्रणा, वातानुकुलित यंत्रे विद्युत अनिवासी इमारती यांचे विद्युत परिरक्षण व नवीन इमारतीचे स्वतंत्रपणे विद्युत भार संकल्पन तसेच प्रत्यक्ष काम करवून घेण्याची क्षमता असणे आवश्यक.<br>३. शासनमान्य संस्थेचे विद्युत पर्यवेक्षक (Electrical Supervisor) चा परवाना असणे आवश्यक.<br>४. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | एकाकी पद (सरळसेवा) |
| १३. | **वरीष्ठ लघुलेखक**<br>वेतन बॅड:<br>एस—१५=४१८००—१३२३०० | १. इयत्ता १० वी उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य)<br>२. मराठी / इंग्रजी लघुलेखन १२० श. प्र.मि. आणि .मराठी / इंग्रजी टंकलेखन ४० / ५० श.प्र.मि. शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १. कनिष्ठ लघुलेखक (इंग्रजी व मराठी) या पदावरील किमान तीन वर्षाचा अनुभव<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनिय अहवाल समाधानकारक<br>३. मागासवर्गीयांसाठी जात वैधता प्रमाणपत्र आरक्षित पदाकरीता आवश्यक. | ५०%(पदोन्नती)<br>५०%<br>(सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | **कनिष्ठ लघुलेखक**<br>वेतन बॅड:<br>एस–१४=३८६००–१२२८०० | १. इयत्ता १० वी उत्तीर्ण (पदवीधर असल्यास प्राधान्य)<br>२. मराठी/इंग्रजी लघुलेखन १०० श. प्र.मि. आणि मराठी/इंग्रजी टंकलेखन ४०/५० शं.प्र.मि. अर्हतेचे शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १. लघुलेखक (इंग्रजी व मराठी) या पदावरील कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल समाधानकारक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक. | ५०% (पदोन्नती)<br>५०% (सरळसेवा) |
| १५. | **संगणक निरीक्षक**<br>वेतन बॅड:<br>एस–१४=३८६००–१२२८०० | — | — | शैक्षणिक अर्हता व आवश्यक अनुभव स्वतंत्रपणे निर्गमित केल्या जाईल. |
| १६. | **तांत्रिक सहायक**<br>वेतन बॅड:<br>एस–१४=३८६००–१२२८०० | १. संबंधीत पदव्युत्तर विभागाकरीता पदव्युत्तर पदवी आवश्यक (पदार्थविज्ञान,भुविज्ञान, रसायनशास्त्र औषधिनिर्माणशास्त्र, मानसशास्त्र) **किंवा** स्नातकोत्तर पदवी व संबधीत प्रयोगशाळेतील उपकरणे हाताळण्याचा किमान एक वर्षाचा अनुभव.<br>२. प्रयोगशाळेतील उपकरणे हाताळण्याचा कमीतकमी एक वर्षाचा अनुभव.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | १००% (सरळसेवा) |
| १७. | **निवड श्रेणी लिपीक**<br>एस–१४=३८६००–१२२८०० | | १. उच्च श्रेणी लिपीक या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव.<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षिक गोपनीय अहवाल समाधानकारक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक<br>4. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १००% (पदोन्नती) |
| १८. | **सांख्यिकी सहायक**<br>वेतन बॅड:<br>एस–८=२५०००–८११०० | १. साख्यिंकीशास्त्र विषयातील पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण **अथवा** सांख्यिकीशास्त्र या विषयासह गणित/अर्थशास्त्र /वाणिज्य या विषयातील किमान द्वितीय श्रेणीत पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण.<br>२. मान्यताप्राप्त संस्थेतील | | एकाकी पद (सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सांख्यिकीशास्त्र अभ्यासक्रमात प्रमाणपत्र / पदविकाधारक उमेदवारांना प्राधान्य.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | |
| १९. | **उच्च श्रेणी लिपीक**<br>एस—८=२५५००—८११०० | | १. निम्न श्रेणी लिपीक पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव<br>२. मागील तीन वर्षाचे वार्षीक गोपनीय अहवाल समाधान कारक<br>३. मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक.<br>४. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १००%<br>(पदोन्नती) |
| २०. | **निम्न श्रेणी लिपीक**<br>वेतन बॅड:<br>एस—६=१९९००—६३२०० | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण<br>२. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि.व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. शासकीय व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक तसेच पदविकांना प्राधान्य.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | १. गट ड श्रेणीतील पदावर किमान ३ वर्षाचा अनुभव तसेच पदोन्नत निम्न श्रेणी लिपीक (सरळसेवा) पदाची शैक्षणिक अर्हतेची अट पूर्ण केलेली असावी.<br>२.मागील तीन वर्षाचे चारीत्र्य प्रमाणपत्र समाधानकारक.<br>३.मागासवर्गीयांसाठी आरक्षित पदाकरीता जात वैधताप्रमाणपत्र आवश्यक. | ५०% (पदोन्नती)<br>५०%<br>(सरळसेवा) |
| २१. | **वरिष्ठ विजतंत्री**<br>वेतन बॅड:<br>एस—८=२५५००—८११०० | १. पदविका परिक्षा (विजतंत्री) उत्तीर्ण किंवा आय.टी.आय.(विजतंत्री) उत्तीर्ण.<br>२. महाराष्ट्र शासनाचे सर्टिफिकेट ऑफ सुपरव्हायझरी कॉम्पीटेन्सी परीक्षा उत्तीर्ण<br>३. उच्च व कमी दाब क्षमतेचा ट्रान्सफार्मर बसविण्याच्या कामाचा व प्रयोगशाळेतील विद्युतसंबधी सर्व कामाचा दोन वर्षाचा अनुभव.<br>४. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | १००%<br>(सरळसेवा) |
| २२. | **कनिष्ठ विजतंत्री**<br>वेतन बॅड:<br>एस—८=२५५००—८११०० | १.पदविका परिक्षा (विजतंत्री) उत्तीर्ण किंवा आय.टी.आय.(विजतंत्री) उत्तीर्ण.<br>२.महाराष्ट्र शासनाचे सर्टिफिकेट ऑफ सुपरव्हायझरी कॉम्पीटेन्सी परीक्षा | | १००%<br>(सरळसेवा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | उत्तीर्ण<br>३.उच्च व कमी दाब क्षमतेचा ट्रान्सफार्मर बसविण्याच्या कामाचा व प्रयोगशाळेतील विद्युतसंबधी सर्व कामाचा दोन वर्षाचा अनुभव.<br>४.MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | |
| २३. | **वाहन चालक**<br>वेतन बॅड:<br>एस—६=<br>१९९००—६३२०० | १. इयत्ता १०वी परीक्षा उत्तीर्ण आर.टी.ओ. वाहन चालकाचा परवाना तसेच वाहन दुरुस्तीचे ज्ञान असणे आवश्यक.<br>२. जड आणि हलकी वाहने चालविण्याचा कायम स्वरुपी परवाना आणि किमान दोन वर्षाचा अनुभव.<br>३. वाहनाच्या यांत्रिक कामाचे ज्ञान असल्यास प्राधान्य. | १. वर्ग ४ मधील किमान ५ वर्षाचा अनुभव आणि ८ वा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक<br>२. आरटीओ चे चार चाकी जड/हलके वाहन चालविण्याचा कायम स्वरुपी परवाना तसेच वाहन दुरुस्तीचे ज्ञान असणे आवश्यक.<br>३. ५ वर्षाचे चाारीत्र प्रमाणपत्र समाधानकारक असणे आवश्यक.<br>४. मराठी,हिन्दी भाषा लिहता वाचता येणे आवश्यक. | २०% (पदोन्नती)<br>८०%<br>(सरळसेवा) |
| २४. | **प्रयोगशाळा सहाय्यक**<br>वेतन बॅड:<br>एस—७=२१७००—६९१०० | १. विज्ञान शाखेतील संबधित विषयातील पदवीधर<br>२. मान्यताप्राप्त महाविद्यालयातील किमान ३ वर्षाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | १००%<br>(सरळसेवा) |
| २५. | **प्रयोगशाळा परिचर**<br>वेतन बॅड:<br>एस—६=१९९००—६३२०० | १. इयत्ता १०वी उत्तीर्ण<br>२. शैक्षणिक/औद्योगिक/शासकीय प्रयोगशाळेतील कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव.<br>3. MSCIT परीक्षा उत्तीर्ण. | | १००%<br>(सरळसेवा) |

## गट—ड

| अ. क्र. | पदनाम वेतनबॅड व ग्रेड वेतन | शैक्षणिक अर्हता व अनुभव | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | सरळ सेवा प्रवेश | विभागीय पदोन्नती (सेवाज्येष्ठता व गुणवत्तेनुसार) | |
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| २६. | **शिपाई** | १.वर्ग ८वी उत्तीर्ण सोबत मराठी, | | १००% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | वेतन बॅड:<br>एस—१=१५५००—४७६०० | इंग्रजी,हिंदी भाषेचे व्यवहारिक ज्ञान आवश्यक. | | (सरळसेवा) |
| २७. | **चौकीदार**<br>वेतन बॅड:<br>एस—१=१५५००—४७६०० | १. वर्ग ८ वी उत्तीर्ण<br>२. सुरक्षा रक्षक या पदावर कार्य केल्याबाबतचा दोन वर्षाचा अनुभव. | | १००%<br>(सरळसेवा) |
| २८. | **फर्रास**<br>वेतन बॅड:<br>एस—१=१५५००—४७६०० | १. वर्ग ८ वी उत्तीर्ण शारीरीक दृष्टया सक्षम | | १००%<br>(सरळसेवा) |
| २९. | **उद्यानरेजा**<br>वेतन बॅड:<br>एस—१=१५५००—४७६०० | १. वर्ग ८ वी उत्तीर्ण व शारिरीकदृष्टया सक्षम | | १००%<br>(सरळसेवा) |
| ३०. | **सफाईगार**<br>वेतन बॅड:<br>एस—१=१५५००—४७६०० | १. वर्ग ८ वी उत्तीर्ण व शारिरीकदृश्टया सक्षम<br>२. साफसफाईचे काम केल्याबाबतचे अनुभव प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य. | | १००%<br>(सरळसेवा) |
| ३१. | **अभियांत्रिकी मजूर**<br>वेतन बॅड:<br>एस—१=१५५००—४७६०० | १. वर्ग ८ वी उत्तीर्ण शारीरीक दृष्टया सक्षम असल्यास प्राधान्य | | १००%<br>(सरळसेवा) |

**परिशिष्ट 'ब'**

**अ) <u>सरळसेवा प्रवेशाने (by recruitment)भरावयाच्या पदांसाठी खालीलप्रमाणे निवड समित्या राहतील</u>**

**गट ''अ'' मधील अधिकाऱ्यांसाठी निवड समिती.**

१. कुलगुरु (अध्यक्ष)
२. मा. कुलपती यांनी व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशित केलेला सदस्य.
३. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य किंवा सहसंचालक, उच्च शिक्षण या पदापेक्षा कमी दर्जा नसलेला त्यांचा प्रतिनिधी.
४. व्यवस्थापन परिषदेने त्यांच्यातून नामनिर्देशित केलेले **दोन** सदस्य.
५. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले दोन विषय तज्ञ (आवश्यक त्या ठिकाणी) सदस्य.
६. राखीव प्रवर्गाच्या पद संदर्भात मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला राखीव प्रवर्गातुन एक सदस्य (आवश्यक त्या ठिकाणी)
७. कुलसचिव, सदस्य—सचिव
(टिप—तांत्रिक पदाचे नेमणुकीसाठी संबंधीत एक विषयतज्ञ/संबधीत विभाग प्रमुख यांची नामिती कुलगुरुंकडुन करण्यात येईल.)

**गट ''ब'' मधील अधिकाऱ्यांसाठी निवड समिती.**

१. कुलगुरु—अध्यक्ष
२. व्यवस्थापन परिषदेने त्यांच्यातून नामनिर्देशित केलेला एक सदस्य.
३. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले एक विषय तज्ञ (आवश्यक त्या ठिकाणी) —(सदस्य)

४. राखीव प्रवर्गाच्या पद संदर्भात मा.कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला राखीव प्रवर्गातून एक सदस्य (आवश्यक त्या ठिकाणी)

५. कुलसचिव, सदस्य—सचिव
(टिप—तांत्रिक पदाचे नेमणुकीसाठी संबंधीत एक विषयतज्ञ किंवा संबधीत विभाग प्रमुख यांची नामिती कुलगुरुंकडुन करण्यात येईल.)

**गट''क'' व ''ड'' मधील सेवकांसाठी निवड समिती.**

१. कुलसचिव—अध्यक्ष
२. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेले दोन वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी—(सदस्य)
३. समाजकल्याण अधिकारी, आदिवासी विकास अधिकारी, जिल्हा प्रकल्प अधिकारी गट—ब किंवा त्यांचा गट ब अथवा त्याहुन कमी दर्जा नसलेला प्रतिनिधी (आवश्यक त्या ठिकाणी)- (सदस्य)
४. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला अल्पसंख्यांक प्रवर्गातील एक प्रतिनिधी.—(सदस्य)
५. तांत्रिक पदांच्या संदर्भात संबधित विभागप्रमुख—(सदस्य)
६. उपकुलसचिव, आस्थापना—सदस्य—सचिव
(टिप:—गट,''क'' व गट ''ड'' च्या निवड समितीमध्ये एक महिला प्रतिनिधी असणे अनिवार्य राहील.)

ब) **<u>वर्ग—१ व वर्ग—.२ च्या विभागीय पदोन्नतीने नियुक्ती करावयाचे प्रस्ताव तयार करुन पदोन्नतीसाठी शिफारशीत करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती राहील.</u>**

१. प्र—कुलगुरु — (अध्यक्ष)
२. कुलगुरुंनी नामित केलेला एक संवैधानिक प्रशासकीय अधिकारी — (सदस्य)
३. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला विद्यापीठातील मागासवर्गिय प्रवर्गातील अधिकारी (अ.जा./अ.ज./वि.जा.—भज/विमाप्र/इमाव)—(सदस्य)
४. कुलसचिव — (सदस्य सचिव)

क) **<u>वर्ग—३ व वर्ग—४ च्या विभागीय पदोन्नतीने नियुक्ती करावयाचे प्रस्ताव तयार करुन पदोन्नतीसाठी शिफारशीत करण्याकरिता खालीलप्रमाणे समिती राहील:</u>**

१. कुलसचिव (अध्यक्ष)
२. कुलगुरुंनी नामीत केलेला एक संवैधानिक प्रशासकिय अधिकारी. —(सदस्य)
३. कुलगुरु यांनी नामनिर्देशित केलेला मागासवर्गिय प्रवर्गातील अधिकारी. — (सदस्य) (अ.जा./अ.ज./वि.जा.—भज/विमाप्र/इमाव)
४. उपकुलसचिव (आस्थापना)—(सदस्य सचिव)